**द्विज पुरस्कार २०१५**

सलाम मानसिक आरोग्याला!

सन्मान परिश्रमगाथांचा !

रविवार, ११ ऑक्टोबर, सकाळी १०.३० ते १.००

गडकरी रंगायतन, ठाणे

प्रिय मित्र,

सस्नेह नमस्कार,

मानसिक आजार आणि मानसिक आरोग्य हे विषय आरोग्यक्षेत्रामध्येही काहीसे दुर्लक्षित राहिलेले .. .परंतु बदलत्या काळाबरोबर मनाच्या आरोग्याचे महत्व आपणा सर्वांनाच नव्याने जाणवू लागले आहे. मानसिक आजार आणि तणावांवर योग्य उपाय करणाऱ्या औषध योजना तसेच मानसोपचारपध्दती आज उपलब्ध होत आहेत. तरीही अेकंदर समाज आणि मनो-स्वास्थ्य या दोहोंमध्ये अज्ञान-अंधश्रध्दा-गैरसमजुतींची दरी अजून महानगरांमध्येही जाणवते.

'**सुदृढ मन सर्वांसाठी**' हे ध्येयवाक्य स्वीकारुन गेली सव्वीस वर्षे या क्षेत्रात काम करणाऱ्या इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ (आय्.पी.अेच्.) ह्या संस्थेने मानसिक आरोग्य आणि समाज यांच्यामधले हे अंतर कमी करण्यासाठी, संपूर्ण आशिया खंडात प्रथमच, अेक विधायक उपक्रम योजला सुमारे आठ वर्षांपूर्वी.

या उपक्रमाचे नाव आहे '**द्विज पुरस्कार**'. गंभीर मानसिक आजाराशी सामना करुन स्वतःचे आणि कुटुंबाचे आयुष्य पुन्हा प्रकाशमान करणाऱ्या रुग्णांचा सन्मान. या व अशा रुग्णांसाठी उभे रहाणाऱ्या कुटुंबीयांचा सन्मान.

संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या शेकडो अर्जांच्या शास्त्रीय तपासणीनंतर, राज्यस्तरीय समितीने निवडलेले तीन रुग्ण प्रतिनिधी आणि दोन कुटुंबीय यांना पुरस्कार देण्याचा आगळा समारंभ, रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०१५ रोजी योजला आहे. गतवर्षीपासून ह्या पुरस्काराचे नामकरण केले गेले आहे, पद्मा मनोहर फाटक स्मृती द्विज पुरस्कार. मानसिक आजाराला तोंड देताना आपल्या कुटुंबापासून दूर गेलेल्या पद्माच्या स्मरणार्थ फाटक कुटुंबीयांनी ह्या पुरस्कारासाठी कायमस्वरुपी आर्थिक देणगी दिलेली आहे.

या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून येणार आहेत टेलीव्हिजनच्या पडद्यामधून तुमच्या आमच्या घरी येणारे मराठीतील सर्वात् लोकप्रिय टीव्ही स्टार्स! (सौजन्य झी मराठी)

आपण या कार्यक्रमाला जरुर उपस्थित राहून, मानसिक आरोग्य क्षेत्रातील अेका क्रांतीकारक क्षणाचे साक्षीदार व्हावे ही विनंती.

आपले.

- आय्.पी.अेच्. परिवार,
- युअेस्व्ही फार्मा
- फाटक परिवार

रविवार दिनांक ११ ऑक्टोबर

सकाळी ठीक १०.३० वाजता

गडकरी रंगायतन, ठाणे

प्रवेश विनामूल्य!

आसने प्रवेशक्रमानुसार. काही जागा पाहुण्यांसाठी आरक्षित

**तुम्हाला ठाऊक आहे का?**

- ११ ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो
- मानसिक आरोग्य क्षेत्रामध्ये '**द्विज पुरस्कार**' हा उपक्रम, भारत आणि आशिया खंडात प्रथम तर जगामध्ये फक्त दुसऱ्यांदा आयोजित केला जात आहे.
- निवडलेले तीन यशस्वी रुग्ण व दोन कुटुंबीय यांना प्रत्येकी रुपये १०,०००/- अेक आकर्षक सन्मानचिन्ह व मानपत्र देण्यात येईल
- या वर्षीपासून मानसिक आरोग्य क्षेत्रामध्ये कार्यरत अशा स्वयंसेवी कार्यकर्त्यांसाठी एक नवीन पुरस्कार सुरू करत आहोत.
- यंदाच्या वर्षी या पुरस्कारांसाठी अक्षरशः शेकडो अर्ज आले.
- पुरस्कारांचा अर्ज अनेक पानांचा असून रुग्णांच्या प्रवासाची संपूर्ण माहिती देणारा आहे. रुग्ण, कुटुंबीय, उपचार करणारे तज्ञ या तिघांनी वेगवेगळ्या माहितीपत्रिका भरल्या आहेत.

इन्स्टिटट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ (आय्.पी.अेच्.)
श्री गणेश दर्शन, ९वा मजला,
अेल.बी.अेस्. मार्ग, हरिनिवास सर्कल व तीन पेट्रोल पंप जवळ,
पांचपाखाडी, ठाणे (प)-४०० ६०२
मोबाइल नं.: ९५९४०९९४२२
anandiph@gmail.com

युअेसव्ही फार्मा लिमिटेड
बि.अेस.डी. मार्ग,
गोवंडी, मुंबई - ४०० ०८८
फोन नं. ०२२-२५५६४०४८